**शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज आमंत्रित**

**महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग**
**राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण महसुली विभाग यांचे कार्यालय,**
**कक्ष क्र ७२१ / ७२७, ७ वा मजला, कोकण भवन (विस्तार इमारत) नवी मुंबई - ४००६१४**

शासकीय सेवेतून (गट अ किंवा गट ब) (ग्रेड पे रू.६६००/- किंवा त्यापेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी नामिकासूची तयार करण्याकरीता दि.०३/०७/२०२४ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस दि.३१/०७/२०२४ रोजीपर्यंत मुदत वाढ देण्यात देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरूप | वय, अर्हता व अनुभव | पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | शासकीय सेवेतून (गट-अ किंवा गट-ब) (ग्रेट पे रू.६,६००/-किंवा त्यापेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी. | लेखापरीक्षा, कार्यालयीन तपासणी व मूल्यमापन | लेखापरीक्षा, कार्यालयीन तपासणी व मूल्यमापन सबंधि त कामकाजाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. **वयोमर्यादा :- ५८ ते ६३** | १ |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७.१२.२०१६ व सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१०० (भाग-१)/१३ दि. ०८.०९.२०२३ अन्वये अन्वये नमूद अटी व शर्तींच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील.

२. करार पध्दतीने आयोगामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरीक व मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह **जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि.३१/०७/२०२४ पर्यंत सादर करावेत.**

**संपर्क :- राज्य सेवा हक्क आयोग, कोकण महसुली विभाग, ७२१ / ७२७, ७ वा मजला, कोकण भवन (विस्तार इमारत) नवी मुंबई - ४००६१४**

**दूरध्वनी :-** २०८७०५१५

**ई-मेल :-** crts.konkan@maharashtra.gov.in

**(माणिक दिवे)**
**सहसचिव**
**राज्य सेवा हक्क आयोग**
**कोकण महसुली विभाग**

जाह_िरातीस मुदतवाढ.Docx/RTS/C.R.०३/२०२१